antHra 30

# तोरण

दिवाळी अंक १०१, ऑक्टोबर २०२५

## अनुक्रमणिका


- संपादकीय
- आठवणीतील प्रवासाच्या पाऊलखुणा
- अंतरा त जीव रंगला...
- अंतरा – विचारांचे बीज
- अंतरा चे बाळकडू
- जिव्हाळ्याची आणि मायेची संस्था
  - अंतराची आपुलकी
- अंतरा परिवारातला आनंददायी काळ
- समाजाशी नव्याने जोडले गेले
- बीजातून साकारलेला वटवृक्ष
- समाज व निसर्ग यांच्यातला 'सुर' जपणारी अंतरा
- अंतरा सोबत जुळलेली नाळ


## संपादकीय

'अंतरा' संस्थेचे ३१ व्या वर्षात पदार्पण आणि 'तोरण'चा १०१ वा अंक प्रकाशित होणे हा 'दुग्धशर्करा योग' 'अंतरा' परिवाराशी जोडलेल्या प्रत्येकासाठी अत्यंत आनंददायी आहे.

पशुधन पालन आणि संवर्धनाबद्दल समाजाला माहिती देण्याच्या गरजेतून 'तोरण'चा पहिला अंक १९९९ मध्ये निघाला. 'मोबाइल फोन' नसलेल्या त्या जगात माहितीची देवाणघेवाण मुक्तपणे व्हावी, ही आमची इच्छा होती. आम्ही करत असलेले उपक्रम, शेतीसंबंधी मिळालेल्या नवीन गोष्टींची माहिती, तसेच गाव–पाड्यांमध्ये असलेले पशुवैद्यक, औषधोपचार करणारे वैदू आणि व्यावसायिकांची माहिती एकत्रितपणे सामायिक करण्यासाठी आम्ही हे छोटे बातमीपत्र प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला.

'अंतरा' ही स्वयंसेवी संस्था म्हणून नोंदणीकृत होऊन तीस वर्षे झाली आहेत. चढ–उतारांसह

हा एक दीर्घ आणि अविश्वसनीय प्रवास आहे. यातील प्रत्येक कार्यक्रम, प्रत्येक प्रकल्प, प्रत्येक उपक्रम आम्हाला मौलिक शिक्षण देऊन गेला.

## अंतराची नोंदणी

मे १९९५ मध्ये स्वयंसेवी संस्था म्हणून 'अंतरा'ची नोंदणी महाराष्ट्रातील पुणे येथे झाली. पशु आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणाऱ्या आणि सहभागी कृती संशोधन करणाऱ्या समूहांमध्ये, महिला पशुवैद्यक तज्ज्ञांनी सुरू केलेला आमचा गट देशातील पहिला होता. यामुळे आमचे वेगळेपण अद्वितीय ठरले. पशुधनाच्या जतनासाठी आवश्यक असलेल्या पारंपरिक ज्ञान प्रणालींचे दस्तऐवजीकरण आणि प्रमाणीकरण करण्याचे काम करणाऱ्या पहिल्या समूहांपैकी आम्ही होतो. तीस वर्षांनंतरही हे काम काळाची गरज आणि उपयोगिता शोधण्याचा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. देशातील पशुधन प्रणालींमध्ये महिलांचे ज्ञान आणि योगदान यांची नोंद घेणाऱ्या आणि विकास कार्यक्रमांमध्ये आढळलेल्या त्रुटी दूर करण्याचे मार्ग शोधणाऱ्या पहिल्या गटांपैकी आम्ही होतो. उपचार करणारे, परंतु ज्यांना समाजात 'ज्ञानी' म्हणून ओळख नाही अशा महिला पशुपालकांसोबत काम करताना आम्हाला काही रोमांचक गोष्टींचा शोध लागला. आम्ही लोकांचे ज्ञान आणि त्यांच्या पद्धतींना मान्यता मिळवून देण्याचे काम केले. चुकीच्या पद्धतीने आखलेल्या विकास प्रकल्पांमुळे हे ज्ञान कसे हरवण्याचा धोका आहे, याबद्दल वकिली केली. आम्ही अनेक वर्षांपूर्वी स्थानिक आणि पशुपालक समुदायांसोबत आमचे काम सुरू केले होते आणि आज आंतरराष्ट्रीय रेंजलँड्स आणि पशुपालक वर्ष (IYRP) २०२६ आणि आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष (IYWF) २०२६ च्या माध्यमातून पशुपालकांना, विशेषतः महिला पशुपालकांना, ओळख आणि मान्यता मिळवून देणाऱ्या आंतरराष्ट्रीय चळवळींचा भाग असल्याचा आम्हाला अभिमान आहे.

## चळवळी आणि कृषी पर्यावरणशास्त्र

गेल्या काही वर्षांत आम्ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिसंवाद आणि चळवळींमध्येही सहभागी झालो, ज्यात शेती आणि पशुधन संगोपनात कमी रसायनांचा वापर करण्याचे समर्थन करणाऱ्या सेंद्रिय चळवळीचा समावेश होता. या चर्चेत आम्ही औषधी आणि चारा वनस्पती, स्थानिक पशुधन जाती आणि मूल्यवर्धन व बाजारपेठेसह स्थानिक उत्पादन प्रणालींवरील दस्तऐवजीकरण केलेल्या ज्ञानाद्वारे महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकलो. योग्य संशोधन चाचण्यांशिवाय देशात 'जीएमओ' (GMOs) आणण्यावर आम्ही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आम्हाला आमची मूल्ये कृषी पर्यावरणशास्त्राच्या तत्त्वांशी मोठ्या प्रमाणात जुळलेली आढळली.

जागतिक स्तरावर हवामान बदलावर चर्चा (वादविवाद) वाढले आहेत. आम्ही लघु शेती प्रणाली आणि कृषी पर्यावरणशास्त्राचे समर्थन

केले. धोरणकर्त्यांना दिसत नसलेल्या स्थानिक समुदायांना आणि पशुपालकांना आम्ही आमचा पाठिंबा देणे सुरू ठेवले.

## नवीन समस्या आणि भविष्य

जगाला नवीन समस्यांनी घेरले आहे. ग्रहांच्या सीमा आणि हवामान बदल आपल्याला शेती आणि प्राण्यांचे संगोपन करण्याचे नवीन मार्ग शोधायला भाग पाडतात. नैसर्गिक संसाधनांचा गैरवापर तसेच रसायने आणि प्रतिजैविकांचा अविचाराने वापर आपल्याला वनस्पती आणि प्राण्यांच्या आरोग्याकडे वेगळ्या पद्धतीने पाहायला लावतो. वेगाने वाढणारी शहरे आणि ग्रामीण भागातून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर यामुळे गावे आणि शेतजमिनी ओस पडतात आणि शहरी भागात बेरोजगार व कुपोषित लोकांची संख्या वाढते.

शेती पुन्हा एकदा आकर्षक आणि व्यवहार्य बनवता येईल का? हा प्रश्न ३१ व्या वर्षात पदार्पण करत असताना उपस्थित करतो आणि त्याची उत्तरे शोधण्याची वाटचाल पुढे सुरु राहील.

## आशा ओगले (१९३६ –२०२५)

'तोरण'ला जगासमोर आणण्यात आशाताई ओगले यांचा मोलाचा वाटा होता. ९९ अंकांमध्ये त्यांनी मदत केली. त्यांनी प्रत्येक अंकाचे भाषांतर, आयोजन आणि संकलन काळजीपूर्वक केले. प्रत्येक अंकात जिवंतपणा आणि रंगत आणली. आशाताईंनी 'अंतरा'ला अनेक प्रमुख प्रकाशने प्रकाशित करण्यास मदत केली.

आम्ही 'तोरण'चा हा १०१ वा अंक, आशाताईंना समर्पित करतो. 'अंतरा'चे आजचे स्वरूप त्यांच्या मूल्यवान सहभागामुळे आहे.

**डॉ. नित्या घोटगे,**
संचालिका, अंतरा, पुणे



# आठवणीतील प्रवासाच्या पाऊलखुणा

जितेंद्र मैड, पुणे

'अंतरा'सोबत माझी जी वाटचाल सुरू आहे, ती देखील संस्थेच्या वयाइतकीच असावी. १९९४ किंवा १९९५ साल असावे. 'अंतरा'च्या संस्थापक डॉ. नित्या घोटगे, ज्यांना आपण सर्व नित्याताई म्हणून ओळखतो, त्यांची व माझी भेट राईरकर बंगला, डेक्कन जिमखाना येथे झाली. तेथे मी कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी (मिटींग) आलो होतो.

डॉ. गी प्वॉत्व्हँ हे जन्माने फ्रेंच, पण १९७८ मध्ये भारतीय नागरिक झालेले समाजशास्त्रज्ञ. त्यांच्या पत्नी हेमा राईरकर या गोखले अर्थशास्त्र संस्थेत प्राध्यापक होत्या. या दोघांनी पुण्याच्या ग्रामीण भागामध्ये जनजागरणाचे काम सुरू केले होते. गावातील लोकांनी त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन 'गरीब डोंगरी संघटना' सुरू केली होती. या संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या बैठका डेक्कन येथे राईरकर यांच्या घरी व्हायच्या. डॉ. नित्याताई येथे गी बाबांना भेटायला आल्या होत्या. बाबांनी आम्हाला नित्याताईंशी ओळख करून देत त्या पशुसंवर्धन विषयावर काम करत असल्याचे सांगितले. डेक्कन येथे दर महिन्याला पशुसंवर्धन या विषयावर बैठक सुरू करण्याचे ठरले होते. तेव्हापासून नित्याताईंशी नियमित भेटीगाठी सुरू झाल्या. त्यात आजतागायत खंड पडला नाही, अगदी राईरकर बंगल्यावरील आमच्या बैठका बंद झाल्या तरी.

तळागाळातील माणूस कसा विकसित होईल हे ध्येय मनासमोर ठेवून आम्ही काम करत होतो. ''माणसा इथे मी तुझे गीत गावे, असे गीत गावे, तुझे हीत व्हावे'' हे जणू काही आमचे ध्येय गीत बनले होते. त्यामध्ये पशुसंवर्धन विषय येईल असे त्यावेळी मला तरी वाटले नव्हते. पण नित्याताईंच्या भेटीतून एक नवा दृष्टिकोन मिळाला. माणूस हा एकटा बाजूला काढता येणार नाही. त्याच्यासोबत पशु, पक्षी, प्राणी, निसर्गातील जैवविविधता असे सर्व काही येईल. मानवाचा विकास हा पशुपक्ष्यांच्या, पर्यावरणाच्या विकासासोबत जोडलेला आहे, हे तेव्हा माझ्या विद्यार्थी मनाला उमगले.

छोट्या शेतकरी कुटुंबासाठी त्यांनी पाळलेली एखादी गाय, शेळी, वा दोन-चार कोंबड्या खूप महत्त्वाची संपत्ती असते. साथीच्या रोगात दगावल्यास या कुटुंबाला मिळणारा पौष्टिक आहार दुरावला जातो. कोंबड्यांची अंडी विकून घरात येणारे मीठ-मिरची जेवणाची चव वाढवते, हे त्या मायमाऊलीलाच माहीत असते. मात्र, छोट्या पशुपालकांच्या समस्यांकडे लक्ष द्यायला पशुवैद्यक अधिकाऱ्याकडे कधी वेळ असणार? नित्याताईंच्या पशुसंवर्धन बैठकांमधून तयार झालेले कार्यकर्ते दुर्गम भागातील पशुंच्या आरोग्यासाठी, संवर्धनासाठी काम करायचे. यातून या छोट्या कुटुंबाचे पशुधन, शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढत गेले. हे नित्याताईंच्या कार्याचे, 'अंतरा'चे यश होते.

समाजात मोठ्या प्रमाणात ज्ञान आहे. सर्वसामान्य जनतेकडे असलेल्या सामाजिक ज्ञानाला तेव्हाच प्रतिष्ठा मिळू शकेल, जेव्हा त्याची शास्त्रीय मांडणी होईल. त्याची उपयुक्तता व समृद्धी

समाजापुढे मांडली जाईल. हा विचार मनासमोर ठेवून आम्ही समाजातील पारंपरिक ज्ञानाचे संकलन करू लागलो. पशुसंवर्धन बैठकांमध्ये जनावरांचे आजार, त्यावर करण्यात येणारे पारंपरिक उपचार, वनस्पतींचे औषधी उपयोग, वैदू लोकांकडे असलेले पारंपरिक ज्ञान, पशुपालनाच्या पारंपरिक पद्धती, सरकारी योजना आम्ही समजून घ्यायला लागलो. भटक्या व दुर्गम भागात राहणाऱ्या नागरिकांकडे किती प्रगल्भ निरीक्षण शक्ती व नोंद ठेवण्याच्या वेगवेगळ्या पद्धती अस्तित्वात होत्या, हे समजायला लागले. आधुनिक वैद्यक क्षेत्राचा अहंभावीपणा व पारंपरिक पद्धतीमधील नोंदीचा अभाव, या दोहोंमधील विसंवादामुळे समाजाचे मोठे नुकसान होत असल्याचे जाणवत होते. पारंपरिक ज्ञानाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन समाजाच्या समृद्धीचा मार्ग गतिमान कसा करता येईल, यासाठी आमची धडपड सुरू झाली.

'अंतरा' कार्यालयात मी दिलेली प्रथम भेट माझ्या अजूनही आठवणीत आहे. तेथे गरमागरम गवती चहा घेता घेता आम्ही संघटनात्मक कामाच्या वाटचालीवर चर्चा केली. त्यानंतर नित्याताईंनी मला गवती चहाचे एक रोपटे दिले. ते रोपटे आजही माझ्या घरातील कुंडीत फुललेले आहे. जेव्हा जेव्हा मी गवती चहा घेतो, तेव्हा तेव्हा आमच्या वैचारिक मैत्रीचा हा अंतरंगात मुरलेला सुगंध डोके वर काढून पुन्हा काहीतरी नवे करण्याची प्रेरणा देतो.

लँटना गार्डन, बावधन येथे नित्याताईंची औषधी वनस्पतींची नर्सरी आहे. तेथे त्यांनी वेगवेगळ्या औषधी वनस्पतींची रोपे वाढवली आहेत. आपण ज्या विचारांमध्ये काम करतो, तेच विचार आपल्या आचरणात देखील हवेत. छोट्या छोट्या गोष्टीतून आपल्या विचारांची जागरूकता तेवत ठेवण्याचे नित्याताईंचे हे वैशिष्ट्य मला नेहमी प्रेरणा देते.

भटकंती करणाऱ्या पशुपालक समाजाला मोबाइल चार्जिंग करायला कुठे वीज मिळणार, त्यांची ही अडचण लक्षात घेऊन सौर कंदील (बॅटरी), चार्जर त्यांनी धनगर समाजाला भेट दिले. पशुपालनात पुरुषांइतकाच महिलांचा सहभाग मोठा असतो. त्यांच्या ज्ञानाकडे व सहभागाकडे आत्तापर्यंत दुर्लक्षच झाले आहे. धनगर महिलांसाठी आदर्श पशुपालक पुरस्कार देऊन त्यांनी या महिलांचा सन्मान वाढवला आहे.

पशुजन्य उत्पादने, औषधी वनस्पतींचे ज्ञान, कलाकुसरीचे काम, लोककला व मौखिक साहित्य अशा विविध मुद्यांचा विचार करत नित्याताईंनी या पशुपालकांना त्यांच्या जीवन समृद्धीकडे पाहण्यास व त्यावर कृती करण्यास प्रवृत्त केले आहे. नित्याताईंचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांना माहीत आहे की, हे काम कोणी एक व्यक्ती करू शकणार नाही. त्यासाठी पशुपालक समाज, इतर समाज, शासन, त्या त्या विषयातील तज्ज्ञ, संस्था व आंतरराष्ट्रीय विषयावरील अभ्यासक अशा अनेकांची मदत लागणार आहे. त्या सर्वांची एकत्र मोट बांधत विचारमंथन घडवून आणण्याचे त्यांचे काम सातत्याने सुरू असते. त्यांच्या उदारमतवादी दृष्टिकोनामुळे मी 'अंतरा' परिवाराशी कायमचा जोडला गेलो.

या कार्यात नित्याताईंचा उजवा हात म्हणून मानसीताई परांजपे भक्कमपणे उभ्या असतात. आर्थिक व्यवहाराबरोबरच कार्यालयीन व्यवस्थापन उत्तमपणे पाहतात. त्या उत्तम कवी आहेत. संगिताताई खापरे या सक्रिय कार्यकर्त्या म्हणून सगळीकडे वावरत असतात. त्या मला दुर्गादेवीसारख्या वाटतात. त्यांना काय येत नसेल असा मला प्रश्न पडतो. सतत हसतमुख, कुठल्याही दुर्गम भागात, धनगरवाड्यावर जायला या एका पायावर तयार असतात. सर्वांशी घरचे संबंध आहेत. प्रत्येकाच्या अडी–अडचणींची माहिती यांना असते. लोकांकडून विविध विषय समजून घेत त्यांच्या बारीक–सारीक नोंदी चित्रगुप्ताप्रमाणे त्या वहीमध्ये नोंदवत असतात. त्यांच्या वहीमधील नोंदींवरून काही जणांची पीएचडी होऊ शकते, हे मी विश्वासाने सांगतो. संगिताताई पारंपरिक वनस्पती घेऊन त्यापासून विविध औषधे बनवतात. इतरांना देखील ही औषधे कशी बनवायची याची माहिती देतात.

भटकंती करणाऱ्या पशुपालकांच्या मार्गाची नोंद, भटक्या पशुपालकांच्या जीवनातील लांडग्याचा सहभाग, भारतीय नागरिकत्वाची ओळख बनलेले निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड या लोकांपर्यंत पोहोचले आहे का याची पाहणी, जोरदार पावसाने शेकडो मेंढ्या मेल्यानंतर या विषयाला वाचा फोडण्यासाठी अभ्यासपूर्वक बनवलेला माहितीपट, धनगर महिलांकडील जात्यावरील ओव्यांचे संकलन, महिला पशुपालकांचे अनुभव, धनगर समाजातील जत्रा–यात्रा, त्यांचे विधी व परंपरा, दैवते, विविध पशुपालक जाती समूहांची ओळख, त्यांची वैशिष्ट्ये, पारंपरिक आहार पद्धती ('रेसिपी') याची अनुभूती मला 'अंतरा'च्या माध्यमातून मिळाली. ज्या भाज्या कधी पाहिल्या नव्हत्या, त्यांची आगळी–वेगळी चव मला चाखायला मिळाली. मेंढीचे तूप खाण्याचा अनुभव मला महेंद्र खताळमुळे मिळाला. कोरोना काळात धनगर समाजातील भटकंती करणाऱ्या कुटुंबांवर आलेले कठीण प्रसंग ऐकून अंगावर काटा यायचा. अशा वेळी आपल्या ओळखीचा वापर करत त्यांना सहकार्य पोहोचवण्यात यश मिळाले, तेव्हा मनाला मिळालेली सुखद भावना अजूनही विसरू शकत नाही.

सुषमा अय्यंगार यांच्यासारख्या अनुभव–समृद्ध संशोधक समाज अभ्यासकांची ओळख नित्याताईंमुळे झाली. त्यांच्याशी होणाऱ्या संवादातून मला सातत्याने नवे दृष्टिकोन व विचार मिळत गेले. महेंद्र खताळ, मल्हारी हाके, अण्णा हाके, खंडू करगळ, हनुमंत कोळपे, नंदा कोळपे, सजल कुलकर्णी, राजन कुळये, प्रफुल्ल कालोकर, राहुल डंकरवार, सोमनाथ दडस, राकेश येलकुचीवार, ज्ञानेश्वर गवळे, लोमेश्वर अस्वले, भाऊसिंग चौधरी, निळकंठ मामा, रामजी जोगराणा आणि अनेक पशुपालक व सामाजिक कार्यकर्त्यांनी माझ्या अनुभवांची समृद्धी वाढवली.

भटक्या पशुपालक समाजाची व्यवस्थित नोंद सरकारकडे नाही. त्याबद्दल अनास्थाच आहे; मात्र त्यांच्याकडे असलेल्या पशुधनाची नोंद करण्याच्या निमित्ताने का होईना, या समाजाची व्यवस्थित दखल घेतली जावी यासाठी नित्याताई करत असलेली धडपड

मला त्यांच्यातील कार्यकौशल्याची प्रचिती देते. आपण धोरणकर्ते बनायला हवे हा त्यांचा संदेश मला सतत जागृत ठेवतो. नित्याताईंनी सखोल अभ्यासातून व 'अंतरा'च्या वैचारिक कार्यमंथनातून जी मूल्ये पुढे आली, त्याचे पुस्तकाच्या रूपातून, माहितीपटातून व विविध परिषदांमध्ये मांडण्यात आलेल्या शोधनिबंधातून केलेले सादरीकरण समाजाच्या पडताळणीसाठी व चर्चेसाठी उपलब्ध आहे. ज्यांच्यासाठी विकास कामे करायची आहेत, त्यांना विश्वासात घेऊन, त्यांच्या सहभागातून विकास कामे करायला हवीत. विकासातील सर्वसामान्य जनतेचा सहभाग शाश्वत समृद्धीकडे नेऊ शकतो. सक्रिय लोकशाहीसाठी समंजस संवाद हवा. समपातळीवरील मैत्रत्वाचा संवाद उन्नत समाज घडवू शकतो, हा डॉ. गी बाबांनी दिलेला विचार त्या पुढे नेत आहेत, असे मला त्यांच्या कृतीतून नेहमीच दिसले आहे. त्यामुळे माझ्या मनात त्यांच्याबद्दलचा आदर संवर्धित होत जातो. परिणामी, माझे 'अंतरा'बरोबरचे नाते अधिक घट्ट बनले आहे. त्याचे एक सुंदर लेणेच जणू माझ्या हृदयात कोरले गेले आहे. त्यातून निघणारा सूर मानवी विकासाला साद घालतो आहे.

## अंतरा त जीव रंगला...

**संगिता खापरे**

'अंतरा' संस्थेशी माझा संबंध आला, ती एक गंमतीदार कहाणी आहे. माचिवलेवाडी, तरवळ, जि. रत्नागिरी या आमच्या गावात डिसेंबर १९९८ मध्ये एक मोठी बैठक आयोजित करण्यात आली होती. पुणे येथे पशु आरोग्य कार्यकर्ती प्रशिक्षणासाठी गावातून एक महिला प्रतिनिधी निवडायची होती. घरातून परवानगी मिळणार नाही म्हणून कोणतीही महिला तयार होत नव्हती.

गावातील काही महिलांनी माझे नाव प्रशिक्षणासाठी सुचवले आणि गाववाल्यांनी माझी पुण्याला जाण्यासाठी निवड केली. पण माझी आई मला पुण्याला पाठवायला तयार नव्हती. आई म्हणाली, माझ्या मुलीला मी बाहेर नाही पाठवणार. तेव्हा आमच्या गावातील तुकाराम कुळये यांनी माझ्या आईला समजावले की, पुण्याला तुझी मुलगी काही एकटी जाणार नाही. त्यामध्ये काही जाणत्या, लग्न झालेल्या महिला पण आहेत. मग माझी आई मला पुण्यात प्रशिक्षणासाठी पाठवायला तयार झाली.

मला नेहमीच महिलांसोबत गप्पा मारायला आवडते. कोणता कार्यक्रम असेल तर महिलांमध्ये मिळून मिसळून राहायला आवडते. पाच दिवसांच्या प्रशिक्षणासाठी रत्नागिरीहून आम्ही दहा जण पुण्याला आलो. या प्रशिक्षणातून 'अंतरा' संस्थेच्या कार्याची, उद्देशाची मला ओळख झाली. ही ओळख मला 'अंतरा'शी कायमची जोडेल, असे त्यावेळी तरी वाटले नव्हते.

तेथून गावी परत आले, तेव्हा माझ्या घरच्या कोंबडीच्या पिल्लाला 'देवी' (Smallpox) आजार झाला असल्याचे दिसले. 'अंतरा'मध्ये घेतलेल्या प्रशिक्षणाचा मी त्यावर वापर केला. मी केलेल्या उपचाराने आठ दिवसांत पिल्लू बरे झाले. मी खूश झाले. त्यातून मला आणखी शिकण्याची आवड निर्माण झाली. त्यानंतर असलेल्या दुसऱ्या प्रशिक्षणात मी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

आमच्या शेजारच्या घरातील दोन जनावरांना 'किवाण' (जखमेत किडे होणे) झाले होते. पुण्यातील प्रशिक्षणात मला नित्याताईंनी जो उपचार शिकवला होता, तो मी जनावरांवर केला आणि जनावरे बरी झाली. तेव्हापासून जनावर आजारी पडले की, गावातील लोक मला त्यांच्याकडे बोलावू लागले. जनावरांविषयी माझ्या मनात पूर्वीपासून मायेची धारणा होती. त्यामुळे त्यांच्यावरील उपचार व्यवस्थित शिकण्याची माझ्या मनात इच्छा होती.

गावात जनावरे मेली तर लोक उघड्यावर टाकत. उघड्यावर टाकलेली जनावरे परत कावळे, कुत्रे व इतर जनावरे गावात ओढून आणायचे; म्हणून आम्ही लोकांना समजावून सांगितले की, मेलेली जनावरे उघड्यावर टाकू नका.

आमच्या भागात तीस गावांमध्ये एक पशुवैद्यक डॉक्टर होते. त्यांना प्रत्येक गावात जाऊन जनावरांच्या आजारांवर उपचार करणे शक्य होत नव्हते. डॉक्टर कधी गावात यायचेच नाहीत. आमच्याकडे कोंबड्यांना 'मानमोडी', 'देवी' असे आजार व्हायचे. एकदा आजार आला की, सर्व कोंबड्या मरून जायच्या. त्यामुळे मोठे नुकसान व्हायचे. मग मी लोकांना लसीकरणाबद्दल माहिती समजावून सांगायला लागले.

लसीकरण गावातील फक्त एखाद्या–दुसऱ्या कुटुंबाने करून उपयोग होत नाही. गावातील सर्व जनावरांचे लसीकरण झाले, तरच त्याचा फायदा होतो. त्यामुळे सर्वांनी जनावरांचे लसीकरण करून घ्या, असे मी सांगायचे. पशुपालकांना दिलेल्या या शिक्षणाचा उपयोग होऊ लागला. जनावरे व कोंबड्या यांना वेळेत लसीकरण व वनस्पती औषधांचा वापर लोकांनी गावात सुरू केला. आम्हाला लोकांना या विचारापर्यंत पोहोचवण्यासाठी गावात बऱ्याच बैठका घ्याव्या लागल्या.

मी 'अंतरा'मध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर त्याचा उपयोग रत्नागिरी जिल्ह्यातील विविध गावांमध्ये केला. गाय व बैलांना होणारे पोटफुगी, जुलाब, किवाण (किडे झालेली जखम), ताप हे आजार, तसेच कोंबड्यांना होणारे 'मानमोडी' व 'देवी' हे आजार आम्ही बरे केले. हजारहून अधिक कोंबड्या या उपचारामुळे आजारातून बऱ्या झाल्या. गाव खूप आतमध्ये असल्यामुळे डॉक्टर तिथे लवकर पोहोचायचे नाहीत. त्यामुळे लोक मलाच उपचारासाठी बोलावयाचे. करबुडे येथे एका पोपटाच्या डोळ्यात तार अडकली होती. कोणी त्याला हात लावायला तयार नव्हते. मी ती तार हळूच काढली आणि तो पोपट बरा झाला.

तरवळ, माचिवलेवाडी येथे एक गाय व्यायली (विली). मात्र, नंतर तिची वार (नाळ) पडली

नाही. त्यामुळे पशुपालक कुटुंब चिंतेत होते. डॉक्टरची वाट पाहून तीन तास झाले, तरी ते पोहोचले नसल्याने त्यांनी मला बोलावले. मी गाईच्या पोटात हात घालून, वार बाहेर पाडली, तेव्हा ती गाय मोकळी झाली.

डोळ्यात फूल (ढीरलहोर) पडल्यानंतर शेवग्याच्या पानांचा रस करून, गाळून, डोळ्यात टाकून अनेक जनावरांचे आजार बरे केले आहेत.

गावात वनस्पती औषधे देणारे वैदू होते. मी माहिती विचारायला गेले. पण ते माहिती देत नव्हते. तू मुलगी आहेस. तुला काय कळणार? असे ते बोलत होते. मी त्यांना सांगितले की, जनावरांचा सांभाळ व त्यांच्यावरील उपचार शिकायला मी पुण्यात जाते. आमच्या मॅडम डॉ. नित्या घोटगे या जनावरांच्या डॉक्टर आहेत. त्या आम्हाला शिकवतात. त्यावर ते वैदू बोलले की, तुला साहेबाची खुर्ची भेटणार आहे का, ते सांग. मी त्यांना सांगितले की, मी या औषधांचा चांगला उपयोग करेन. तुम्ही जी माहिती देणार आहात, ती तुमच्या नावाने पुस्तकांमध्ये छापणार आहेत. त्यानंतर त्या वैदूने मला सर्व माहिती दिली. आज ते वैदू हयात नाहीत, पण त्यांनी दिलेली सर्व माहिती त्यांच्या नावानिशी 'अंतरा'च्या संग्रहालयात आहे.

धनगर समाज या विषयावर २००५ सालापासून मी माहिती घ्यायला सुरुवात केली. मला आधी धनगर समाजाबद्दल काहीच माहिती नव्हती. वेगवेगळ्या गावात जाऊन बैठका घ्यायला लागले. मग हळूहळू सर्वांची ओळख झाली. धनगर महिलांना मी जेव्हा माझी माहिती सांगते, तेव्हा त्या त्यांची माहिती सांगतात. आता माझी धनगर समाजातील अनेक महिलांशी चांगली मैत्री झाली आहे. त्या स्वतःहून व्यवस्थित माहिती देतात.

'अंतरा' संस्थेत आल्यापासून मी शेती, जनावरांविषयी खूप काही शिकले. वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन प्रशिक्षण देणे, गावातील महिलांबरोबर चर्चा करणे, चर्चेतून आलेल्या प्रश्नांची माहिती देणे असे काम करते. औषधांबद्दल मी खूपच शिकले. प्रत्यक्ष त्याचा वापर देखील करते. मी जे शिकले, ते इतर सर्वांना सांगते. डॉक्टर नित्या मॅडम यांनी मला खूप काही शिकवले. 'अंतरा'त काम करत असताना माझ्या मुली लहान होत्या. त्यांचा सांभाळ करण्यासाठी लागणारी आवश्यक ती सर्व सवलत देत त्यांनी मला संस्थेत सांभाळून घेतले.

मी जेव्हा गावात जाते, तेव्हा मी 'अंतरा' संस्थेतून आले असे बोलले, तर लोक मला आदराने 'नमस्ते' बोलतात. प्रेमाने घरी बोलवतात. जनावर आजारी असेल, तर सांगतात. कोणते औषध द्यायचे ते विचारतात. औषधे खूप छान आहेत, असे बोलतात. मला घडवणाऱ्या या संस्थेबद्दल माझ्या मनात खूप अभिमान आहे. मॅडमचे व संस्थेचे नाव घेऊन मी पुढे जात आहे. 'अंतरा' आता ३० वर्षांची झाली आहे.

मी संस्थेत येऊन खूप शिकले. विविध ठिकाणी जाऊन प्रशिक्षण देणे, लोकांबरोबर चर्चा करणे यासारखी विविध कामे मी संस्थेमुळे करू शकले. 'अंतरा' संस्थेसोबतच्या माझ्या प्रवासाला २८ वर्षे पूर्ण झाली आहेत. येथे

मिळालेली शिकवण, प्रेरणा आणि संस्थेतील सर्वांसोबत कुटुंबासारख्या जुळलेल्या नाळेची ही जिवंत कहाणी आहे.

या संस्थेत पाऊल टाकले, तेव्हा मी पूर्णपणे एका नवीन क्षेत्रात प्रवेश केला होता. कार्यकर्ती म्हणून नवीन असल्याने काहीशी घाबरलेली, पण मनात शिकण्याची इच्छा आणि प्रचंड जिद्द होती. पण प्रत्येक दिवस मी एक नवीन संधी म्हणून पाहिला. तेव्हा स्वतःला मी हेच सांगायचे की, आपलं काम आपल्याला ओळख मिळवून देईल. वर्षानुवर्षे प्रगतीचा प्रवास करताना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या. प्रत्येक नवीन पद ही एक परीक्षा होती.

'अंतरा'मध्ये लागल्यापासून प्रशिक्षण, बैठका, प्रदर्शन, स्टॉल, सर्वेक्षण या निमित्ताने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना व गावांना मला भेटी देता आल्या. बंगळूर, कर्नाटक, उस्मानाबाद, विशाखापट्टणम, दिल्ली, मदुराई, आंध्रप्रदेश अशी बरीच शहरे, जिथे मी कदाचित कधीच गेले नसते, अशा ठिकाणी जाता आले. विमानात बसून नेपाळला जाण्याची संधीसुद्धा मिळाली. बऱ्याच परदेशी लोकांना भेटल्यामुळे, थोडे इंग्रजी बोलण्याचे धाडस केले गेले. कामाच्या माध्यमातून मी नेतृत्व, व्यवस्थापन, वेळेचे नियोजन आणि अनेक व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केली. यशाची चवही घेतली आणि क्वचित प्रसंगी अपयशाच्या कटू क्षणांनाही सामोरे गेले. पण कधी थांबले नाही.

सर्व सहकाऱ्यांचे सहकार्य खऱ्या अर्थाने कुटुंबियांसारखेच होते. या प्रवासात माझ्या सहकाऱ्यांनी खूप आधार दिला. त्यांनी मला साथीदार मानले, मार्गदर्शकही केले आणि मैत्रीही दिली. संस्थेतील कार्य–संस्कृतीनेच मला आत्मविश्वास दिला. आपण एकसंघ आहोत, हा अनुभव मिळाला.

काही महत्त्वाचे प्रकल्प, जे संस्थेच्या इतिहासात लक्षात राहतील, त्यामध्ये सहभागी होण्याचा सन्मान मला मिळाला. त्या क्षणांनी माझ्या कामाच्या वाटचालीत एक विशेष ओळख दिली. एखाद्या योजनेची यशस्वी अंमलबजावणी, वेळेच्या आधी पूर्ण केलेला प्रकल्प किंवा संघाला (टीम) दिलेली दीक्षा हे सर्व माझ्या आयुष्याच्या आठवणींचा एक भाग आहेत.

या २८ वर्षांत संस्थेने केवळ मला व्यावसायिक दृष्टीने नाही, तर वैयक्तिक पातळीवरही घडवले. काम करत करत संयम, सहनशीलता, माणसे ओळखण्याची दृष्टी आणि संकटातही उभं राहण्याची ताकद मिळाली. या संपूर्ण प्रवासात ज्यांनी मला मदत केली, साथ दिली, मार्ग दाखवला, त्या डॉ. नित्या मॅडम यांची मी ऋणी आहे. ही संस्था माझ्यासाठी एक कामाचे ठिकाण नव्हते, तर ती माझी दुसरी शाळा आहे.

'अंतरा' संस्थेसोबतचा २८ वर्षांचा हा प्रवास संपलेला नाही. तो एका टप्प्यावर पोहोचतोय. मी अजूनही शिकतेय. अजूनही उभी राहतेय आणि पुढच्या पिढीला काहीतरी देण्याची प्रेरणा घेतेय. शेवटी एवढेच– संस्था बदलू शकतात, पण कामाप्रती निष्ठा, माणसांशी नाते आणि आयुष्यात मिळालेली साऱ्यांची शिकवण ती कायम आपल्या सोबत राहते.

## अंतरा - विचारांचे बीज

डॉ. पल्लवी कुरुंदकर

आधी बीज एकले। बीज अंकुरले रोप वाढले। एका बीजापोटी, तरु कोटी। कोटी जन्म घेती सुमने फले।।

श्री संत तुकाराम महाराजांच्या वाणीतून आलेल्या अभंगाप्रमाणे 'अंतरा'मधील अनुभव आहे. दूरदर्शी विचाराच्या पशुवैद्यकाच्या विचारातून नावारूपाला आलेल्या संस्थेचा भाग असल्याचा आम्हाला अभिमान आहे.

'अंतरा' या सेवाभावी संस्थेने तळागाळातील लोकांना 'पशुपालन हे आपल्या जगण्याचे साधन असू शकते' हे समजून सांगितले व त्या प्रक्रियेचा आम्ही पशुवैद्यक म्हणून एक भाग होतो. निष्णात, तज्ज्ञ, विषयाचा गाढा अभ्यास असलेले, समाजाचे देणे आहे ही जाण असलेल्या विद्वान व्यक्तींचा सहवास लाभला. 'अंतरा'तील सर्व प्रकल्पांच्या माध्यमातून काम करताना आपसूकच खूप गोष्टी अंगवळणी पडत गेल्या.

१. प्रत्येक उपक्रमात लोकसहभाग व लोकांना काय बदल हवा आहे आणि उपलब्ध साधनसामग्रीतून काय बदल करू शकतो, याविषयी चर्चा करणे. (ही चर्चा कधीही एकतर्फी केली नाही.)

२. पशुपालनात व्यवस्थापनाचे महत्त्व – पशुवैद्यकीय शिक्षणात घेतलेल्या ज्ञानाला विविध ठिकाणच्या भौगोलिक परिस्थितीनुसार केलेले बदल अमलात आणून सोयीच्या, सुटसुटीत पद्धतीने पशुपालन करून आर्थिक फायदा होऊ शकतो. (मुख्यतः कोंबडी पालन, शेळी पालन)

३. हर्बल किचन गार्डन – प्रतिजैविक–विरहित प्राणीजन्य उत्पादने (Antibiotic residue free) विषयी आता चर्चा होत आहे. परंतु 'अंतरा' संस्थेमध्ये याविषयी बरीच वर्षे आधी काम सुरू झाले आहे. प्रत्येकाच्या घरात आयुर्वेदिक औषधी गुण असलेली झाडे असावीत, जेणेकरून घरगुती प्राथमिक उपाय करून जनावरांवर विविध आजारांसाठी होणारा विविध प्रतिजैविकांचा मारा कमी होईल.

४. पारंपरिक पशुऔषधी व पशुउपचार (Ethno Veterinary Medicine) – यामध्ये अतिशय उपयुक्त, उपलब्ध संसाधनाचा वापर करून, कोणतेही दुष्परिणाम नसलेले व कमी खर्चात उपाय होणारी ही पद्धत आहे. रोजच्या जीवनात पशुपालकाने पारंपरिक पशुऔषधी वापरली, तर जनावराचे आरोग्य चांगले राहील, औषध–विरहित प्राणीजन्य उत्पादने मिळतील व जनावरांच्या उपचारावर होणारा खर्च निश्चितच कमी करता येतो.

५. प्रशिक्षण व विस्तार कार्य – 'अंतरा' संस्थेमध्ये काम करत असताना वेळेचे व्यवस्थापन, ताण–तणावांचे व्यवस्थापन, रागावर नियंत्रण, संवाद कौशल्यांचा विकास, इंग्रजी संभाषण वर्ग या सर्व

गोष्टी आम्ही गट म्हणून शिकत गेलो. हल्ली या गोष्टी शिकण्याकरिता वेगवेगळे वर्ग (क्लास) लावले जातात. आम्हाला मात्र त्या येथे कामातून आत्मसात होत गेल्या. प्रशिक्षणाच्या विविध प्रकल्पांमधून मराठी, हिंदी, कन्नड या भाषांमध्ये प्रशिक्षण देण्याचा अनुभव मिळाला व ही पुंजी आता खासगी (निजी) जीवनात खूप उपयोगी होत आहे, असे नेहमी वाटते. 'अंतरा' संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.



## अंतरा चे बाळकडू

डॉ. गायत्री राजूरकर

पशुवैद्यकाची पदवी घेऊन कॉलेजमधून बाहेर पडल्यावर 'किती जनावरांना उपचार करून ठीक करू' अशी आशा असलेल्या मला २००२ मध्ये 'अंतरा' संस्थेत काम करण्याची संधी मिळाली. संस्थेत जनावरांवरील उपचारांचा वेळ व खर्च कसा कमी करता येईल, त्यांच्या सांभाळासाठी करावयाचे व्यवस्थापन कसे सुधारायचे, हे मला शिकवण्यात आले. पारंपरिक आणि आयुर्वेदिक उपचार पद्धतीची ओळख झाली.

हा काळ असा होता की, ज्यामध्ये उपचार पद्धतीबद्दलच्या माझ्या विचारात आमूलाग्र बदल झाला. ग्रामीण भागातील पशुपालनाच्या विविध पद्धती, त्यावर आधारित अर्थव्यवस्था, पशुपालनाची मानसिकता, पशुपालनामध्ये महिलांची भूमिका, शहरी आणि ग्रामीण भागातील पशुपालन पद्धतीमधील फरक असे अनेक मुद्दे समजले, ज्याचा वापर मी आजही माझ्या कामात करत आहे. पशुपालन आणि त्याच्याशी संबंधित विषयांबद्दलचा माझा दृष्टिकोन घडवण्याचे काम 'अंतरा' संस्थेत झाले.

खेड्यापाड्यांत गरजेनुसार औषधे तसेच पशुवैद्यक उपलब्ध होऊ शकेल याची खात्री नसल्याने संस्थेच्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांत सहभागी झाल्यावर प्रशिक्षण घेण्यापासून ते संपल्यावरही पशुपालकांना त्या प्रशिक्षणाचा उपयोग होतो आहे की नाही, याची खबरदारी घेणे याबद्दल इथेच विस्तृत रीत्या शिकता

आले. देशातील तसेच देशाबाहेरील विद्यापीठे, संस्था यांच्याबरोबर काम करून नवीन क्षेत्राशी संपर्क झाला. खूप काही शिकता आले, ज्याचा उपयोग आजही होत आहे.

'अंतरा' संस्थेने केवळ पशुपालन एवढ्याच क्षेत्राशी मर्यादित कामकाज केले नसून मेंढपाळ महिलांचे आरोग्य, मुलांचे शिक्षण, सेंद्रिय शेती, आहार, महिला सक्षमीकरण, उद्योजकता विकास इत्यादी विषयांवर केलेले सखोल काम देशात आणि जगात नावाजलेले आहे. अशा संस्थेत काम करण्याची मला संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजते.

'अंतरा' संस्थेनंतर मला पाळीव प्राण्यांच्या संस्थेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. तिथे असतानाही प्रतिजैवकांचा काटेकोर वापर, अनावश्यक औषधोपचार टाळणे, व्यवस्थापन सुधारणा करणे या मूलभूत माहितीचा प्रसार व प्रचार होईल याची मी कटाक्षाने काळजी घेतली.

आता सद्यस्थितीत मी पशुधन विकास अधिकारी या पदावर महाराष्ट्र शासनात कार्यरत आहे. तथापि, 'अंतरा' संस्थेने दिलेल्या शिकवणीच्या जोरावर आजही समाधानाने काम करू शकते आहे. मूल्य व तत्त्वनिष्ठा जपण्याचे संस्थेत मिळालेले बाळकडू आजही मला मार्ग दाखवतात.

## जिव्हाळ्याची आणि मायेची संस्था

**प्रमोद पोखरकर**

'अंतरा'सोबत सुरू झालेला माझा प्रवास खूप मनोरंजक ('इंटरेस्टिंग') आहे. मी नोकरीच्या शोधात होतो. पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे येथे अधिकारी असलेले आमचे प्रिय गोरे काका यांनी मला फेब्रुवारी २००१ मध्ये नित्या मॅडमला भेटायला सांगितले. त्यांच्याकडे नोकरीसाठी एक जागा उपलब्ध आहे असे त्यांनी सांगितले. त्या दिवशी पत्नी देविकाबरोबर आणखी एका कामासाठी पुढे जायचे होते, म्हणून तिलाही सोबत घेतले. डॉ. नित्या मॅडम यांनी माझी मुलाखत घेतली, माझ्या अगोदरच्या कामाबद्दल जाणून घेतले, पुढील दोन-तीन दिवसांत संस्थेत रुजू होण्यास सांगितले. माझी मुलाखत सुरू होती, तेव्हा बाहेर देविका माझी वाट पाहत बसली होती. मी देविकाची मॅडमबरोबर ओळख करून दिली. मॅडमने देविकाशी संवाद साधत तिच्या अनुभवाबद्दल जाणून घेतले आणि तिला म्हणाल्या, तूही रुजू हो. अगदी 'एकावर एक फ्री' मिळाल्यासारख्या आम्हाला एकाच ठिकाणी नोकरी मिळाली. हा आनंद अवर्णनीय होता.

डॉ. नित्या घोटगे या नावाजलेल्या, अत्यंत हुशार पशुवैद्यकीय डॉक्टर होत्या. महाराष्ट्रातील गरीब, वंचित, आदिवासी, ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी त्या काम करतात हे पाहून मॅडमचा खूप अभिमान वाटला. त्यांच्या समवेत काम करायला मिळणार हे समजल्यावर अभिमानाने उर भरून आला.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात राहणाऱ्या, काम करणाऱ्या 'अंतरा'च्या कार्यकर्त्यांना औषधी वनस्पतींची रोपवाटिका तयार करण्यास मार्गदर्शन करणे, तसेच कार्यकर्त्यांनी वेगवेगळ्या वैदू, जाणकार मंडळीकडून औषधी वनस्पतींची जी माहिती संकलित केली आहे, तिचे प्रमाणीकरण करणे, संस्थेच्या सर्व उपक्रमात मदत करणे, प्रकाशित होणारे साहित्य निर्माण करण्यास मदत करणे, असे माझे काम असायचे. कार्यकर्त्यांच्या मदतीने वनस्पतीच्या पाल्यापासून औषधं निर्मिती करून ते आठवड्याच्या बाजारात विक्री व्यवस्था करणे, स्टॉल लावून विक्री करणे हे काम मला खूप आवडायचे.

या कामांमुळे रत्नागिरीतील तरवळ गावातील 'अंतरा' कार्यकर्त्यांशी मी जोडला गेलो. तुकाराम, सुनीता, संगीता, राजन, देवश्री, अनिता या कार्यकर्त्यांशी चांगलीच गट्टी जमली. हे लोक तेथील जवळपास ८–१० गावांत पशुपालनासंदर्भात स्थानिक गरीब लोकांमध्ये जाऊन मार्गदर्शन करीत, स्थानिक वनस्पतींचा वापर करून जनावरांचे आजार बरे करण्यास मदत करीत. रोगाचा प्रसार होऊ नये म्हणून लसीकरणही करीत. कोंबडी, शेळी, गाय, म्हैस, बैल यांच्यावर उपचार करीत. स्थानिक लोकं या कार्यकर्त्यांवर खूप खूश असायची. डॉ. नित्या मॅडम यांच्याकडून वेळोवेळी प्रशिक्षणही घेत. वेल्हे तालुक्यात नथू, मुळशीत नाना, लातूरच्या जाणापूरचा दिलीप यांनीही 'अंतरा' संस्थेच्या माध्यमातून स्थानिक पशुपालकांसाठी फार काम केले. त्यामुळे त्यांचे नावही प्रसिद्ध झाले, लोक 'अंतरा'च्या या कार्यकर्त्यांना चांगले ओळखू लागले. डॉ. नित्या मॅडम यांनी या सर्वांच्या आयुष्यात एक नवीन उमेद निर्माण केली.

नित्या मॅडम नेहमी या कार्यकर्त्यांच्या प्रत्येक सुख–दुःखात सामील असायच्या. लग्नकार्य, आजारपण, पैशाची निकड निर्माण झाली आहे, असे समजले की, नित्या मॅडम तात्काळ त्यांना मदत करायच्या. नित्या मॅडम अत्यंत प्रेमळ, निस्वार्थी, परोपकारी, हुशार असल्याने 'अंतरा' संस्थेत खूप खेळीमेळीचे वातावरण असायचे.

मी तरी इतकी चांगली संस्थाच पाहिली नाही. नित्या मॅडमने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी (स्टाफ) सुद्धा खूप साऱ्या गोष्टी केल्या. डॉ. प्रगती, डॉ. पल्लवी, डॉ. प्राची, डॉ. गायत्री, डॉ. मेधा या पशुवैद्यांबरोबर ग्रंथापाल आणि माहिती व प्रेमाचा खजाना आशाताई, चिकाटीची संशोधक नंदिनी, चोख व्यवहारी रूपा, देविका, कधी कधी भेटी देणारा विवेक ब्रुम, यांच्याशीही फारच गट्टी जमली होती. अडीच वर्षांच्या काळात या संस्थेने मला खूप काही आठवणी दिल्या, आनंद दिला, कुटुंबासारखी गोड माणसं दिली.

# अंतराची आपुलकी

ओवी थोरात

महाराष्ट्रात सामाजिक कार्यासाठी ऐंशीच्या दशकात अनेक संस्था उभ्या राहिल्या. त्या काळात महाराष्ट्रात अशा कामाची आवश्यकता होतीच, पण त्यासाठी सर्वकाही देणारे कार्यकर्ते ही होते, त्या कामाचे वातावरण होते. बहुधा यामुळेच जेव्हा जेव्हा मी नित्या घोटगे, संगीताताई, आणि मानसीताई यांना भेटले, तेव्हा त्या काळातील प्रामाणिकपणे काम करत राहण्याचा उत्साह त्यांच्यात मला सतत दिसत राहिला. मी स्वतः स्थलांतर करणाऱ्या समुदायांसोबत काम करत असल्यामुळे, 'अंतरा'च्या कामाची ओळख नेहमीच होत असायची, पण माझे काम इतर प्रदेशांमध्ये असल्यामुळे ही ओळख दुरूनच होती. पशुवैद्यकीय विज्ञान, महिलांचे आरोग्य, आणि सामाजिक तसेच पर्यावरणाशी निगडित समस्या अशा संमिश्र क्षेत्रात काम असल्यामुळे, 'अंतरा'चे प्रत्येक प्रकल्प नाविन्यपूर्ण असत. त्यामुळे काही वर्षांपूर्वी जेव्हा मला त्यांच्यासह काम करण्याची संधी मिळाली, तेव्हा ती मी लगेच पकडली.

'अंतरा'ने इतर दोन संस्थांसह तीन-चार वर्षांपूर्वी पुण्यात एक कार्यक्रम ठेवला होता. भारतात मेंढपाळ तसेच गायी-गुरे पाळणाऱ्या समुदायांसह चांगल्या प्रतीचे काम करणारे लोक हातावर मोजता येण्यासारखे आहेत. त्यात काळानुसार दोन गट झाले आहेत – पहिला म्हणजे अनुभवी कार्यकर्ते आणि संशोधक, आणि दुसरा गट म्हणजे तरुण उत्साही, या कामात रस असणारे आणि काम करणारे पण फारसा अनुभव नसलेले लोक. पुण्यातल्या कार्यक्रमाचा उद्देश या गटांना एकत्र आणून, तरुण, पुढच्या पिढीच्या संशोधकांना आणि कार्यकर्त्यांना मदत करण्याचा आणि त्यांच्याशी संवाद साधण्याचा होता. त्या कार्यक्रमात हे लक्षात आले की, एकत्र येऊन, एकमेकांच्या साहाय्याने हे दोन्ही गट अजून चांगले काम करू शकतात. असा कार्यक्रम हा सध्याच्या काळातील अतिशय दुर्मिळ संधी होती. त्यातून काही नवे छोटे प्रकल्प सुरू झाले.

अशाच एका प्रकल्पामुळे 'अंतरा'च्या संगीताताईंबरोबर पालघर जवळील धनगर कुटुंबांना भेटण्याचा योग आला. आई आणि मुलगी यांच्यातील नाते आणि त्यांच्यात होणारी ज्ञानाची देवाणघेवाण समजून घेण्यासाठी आम्ही काही धनगर कुटुंबांना भेट दिली. तेव्हा 'अंतरा'चे धनगर समाजाशी असलेले दृढ नातेही दिसले. संगीताताईंबरोबर फिरताना अनेक गोष्टी शिकता आल्या. माणसांबरोबरची नाती कशी जपावीत हे बघता आले. पण त्याचबरोबर आई आणि मुलीचे नाते कसे सगळीकडेच प्रेमाने भरलेले असले तरीही, भटके आयुष्य जगण्यासाठी अतिशय महत्त्वाचे असते, त्याचबरोबर धनगरी संस्कृतीशी जोडलेले असते आणि काळानुसार बदलत असते, हे समजून घेता आले. अशा स्त्रीवादी दृष्टिकोनातून भटक्या जमातींबरोबर काम करणारे लोक किंवा संस्था महाराष्ट्रातच नव्हे, तर या देशातच दुर्मिळ आहेत. लोकांबरोबर, समाजाबरोबर काम करायचे असेल तर सगळ्या

गोष्टींचा पाया विश्वास असतो, माणुसकी असते, तसेच समानता आणि बंधुता यांना महत्त्व देणे गरजेचे असते. मी संगीताताईंना नेहमीच हे करताना पाहिले.

अजून एक महत्त्वाचे असे काम जे 'अंतरा'मुळेच, विशेषतः नित्या घोटगे यांच्यामुळे सुरू झाले, ते म्हणजे तरुण कार्यकर्ते आणि संशोधक यांच्यासाठी 'टूलकिट' (साधनांचा संच) तयार करणे. या क्षेत्रात नव्याने येणारे तरुण पुरेशा प्रशिक्षणाशिवाय किंवा अनुभवाशिवाय आपले काम सुरू करतात. बऱ्याचदा असे करण्यासाठी लागणारी चिकित्सक दृष्टी तयार झालेली नसते. उदाहरणार्थ, आपण माहिती गोळा करताना कुटुंबप्रमुखांशी बोलतो, तो बऱ्याचदा पुरुष असतो, मग स्त्रियांच्या समस्या, त्यांची माहिती कशी मिळेल? कुठल्या वेळी कुठली पद्धत वापरावी, स्त्री आणि पुरुष यांच्यातले नाते आणि त्याचे राजकारण यांचा अभ्यास कसा करावा, इत्यादी गोष्टींकडे लक्ष देणे खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे, 'अंतरा'सह काही तरुण आणि अनुभवी संशोधकांनी मिळून विविध काम करण्याच्या पद्धती, महत्त्वाची संसाधने, तसेच इतरांचे अनुभव एकत्र आणून हे टूलकिट तयार करण्याचे काम केले.

त्याशिवाय 'अंतरा'ने छापलेली विविध पुस्तके अनेक लोकांसाठी उपयुक्त ठरली आहेत. बकरी आजारी असेल तर काय करावे, प्राण्यांना लसी कशा आणि कधी द्याव्यात, याशिवाय विविध औषधी वनस्पतींची माहिती असणारी पुस्तके त्यांनी प्रकाशित केली आहेत. पुस्तकांना साथ म्हणून संगीताताई धनगरांकडून तसेच इतर तज्ज्ञांकडून शिकून घेतलेली काही सामान्य आजारांवरची औषधेही तयार करतात. 'अंतरा'च्या कार्यालयात त्यामुळे नेहमीच एक छान सुगंध येत असतो. मला या अशा छोट्या गोष्टींमुळेही 'अंतरा' संस्थेबद्दल आपुलकी वाटते. याची खात्री आहे की, पुढेही 'अंतरा'चे काम या क्षेत्रात महत्त्वाचे आणि नाविन्यपूर्ण काम असेच करत राहील.



## अंतरा परिवारातला आनंददायी काळ

**सई कोडोलीकर**

माझ्या डोळ्यासमोर 'अंतरा' नावाचा एक मोठा परिवार आहे. कामाविषयी बोलायचे झाल्यास, उल्लेखनीय प्रकल्प, शिस्तबद्ध कार्यसंस्कृती आणि तरीही घरगुती जिव्हाळ्याचे वातावरण, ही मला 'अंतरा'ची खास वैशिष्ट्ये वाटतात.

खरेतर मी पूर्णपणे शहरात आणि तेही तिसऱ्या मजल्यावरच्या घरात वाढलेली आहे. पशुपालन, परसबाग, चारा, दुभती जनावरे, धनगर, मेंढपाळ, गोठे, कोंबडीपालन, प्राण्यांचे आजार, औषधोपचार यांच्याशी केवळ ऐकीव संबंध होता. नाही म्हणायला, आमच्या शेजारपाजारात भरपूर लोक कोंबड्या पाळणारे होते, त्यामुळे कोंबड्यांशी चांगली ओळख होती आणि कोल्हापुरात तसे बरेच गोठे होते, शिवाय दूध कट्ट्यांवर दूध प्यायला नेहमीच जात असल्यामुळे अगदीच काही माहीत नाही, असे नव्हते. पण 'अंतरा'त आल्यावर माझी पाळीव प्राणी आणि संबंधित व्यवसायांच्या एका नव्या जगाशी ओळख झाली. या क्षेत्रातली असंख्य माणसे आणि मोठी कामे समजली, प्रत्यक्ष प्रकल्प बघायला मिळाले आणि साडेतीन वर्षांनी मी 'अंतरा' सोडेपर्यंत 'अंतरा'च्या प्रकाशित पुस्तकांमधले चारा पिके, परसबागेतील भाजीपाला, कोंबडीपालन असे दोन-तीन विषय मी डॉ. प्राचीबरोबर प्रत्यक्ष शिकवायला लागले होते. ही माझी प्रगती मजेदार होती. आज आठवताना गंमत वाटते.

'अंतरा'तल्या माझ्या नोकरीचे स्वरूप प्रामुख्याने कार्यालयीन कामकाज बघणे आणि इतर बारीकसारीक मदत अशा स्वरूपाचे होते. मात्र मला त्याव्यतिरिक्तही विविध अनुभव मिळाले. 'अंतरा'च्या प्रत्येक कामात माझ्यासारख्या नवख्या व्यक्तीला सहज सामावून घेतले गेले, जबाबदाऱ्या सोपवल्या गेल्या. त्यामध्ये 'बाएफ' (BAIF) आणि 'सीडीएस' (CDS) मधले कार्यकर्त्यांसाठीचे अनेक निवासी तसेच बाह्य प्रशिक्षण कार्यक्रम होते, आयआयएम अहमदाबाद मधून उन्हाळी प्रशिक्षणासाठी येणारी दहा मुलांची निवासी तुकडी (बॅच) होती, देश-विदेशातील विविध पाहुण्यांची येण्याजाण्याची आणि राहण्या-जेवण्याची सरबराई होती, पुणे आणि हैदराबादला होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभा (AGM) होत्या, प्रकाशनाच्या वाटेवर असलेल्या पुस्तकांच्या छपाईची (प्रिन्टिंगची) मुद्रालयात जाऊन प्रगती बघणे होते, कात्रज प्रकल्प होता आणि अनेक निमित्तांनी 'अंतरा'च्या पुढाकाराने घेतले गेलेले पुष्कळ नवनवीन उपक्रम होते.

'अंतरा'ची पुस्तके आणि 'तोरण' हा विशेष कौतुकाचा भाग म्हणता येईल. डॉ. नित्यामॅडम, इतर डॉक्टर्स आणि कार्यकर्त्यांनी खपून संशोधित केलेली विविध विषयांवरची सचित्र माहिती, सामान्य माणसाला सहज समजेल अशी सोपी मराठी भाषा वापरण्यासाठी आशाताईंची मेहनत, मिलिंद मुळीक यांची देखणी रेखाटने आणि आकर्षक रंगीत मुखपृष्ठे, पुस्तकाची उत्कृष्ट छपाई आणि दर्जा, या वैशिष्ट्यांमुळे 'अंतरा'चे प्रत्येक पुस्तक आजही पशुपालक आणि अभ्यासकांसाठी संग्राह्य आहे. 'तोरण'

मासिकाच्या प्रत्येक आवृत्तीसाठी नियमित केले जाणारे तळमळीचे प्रयत्न आठवतात.

'अंतरा'तल्या सगळ्या सहकाऱ्यांशी माझे आपुलकीचे नाते निर्माण झाले. 'अंतरा'ने आमच्यासाठी 'स्पोकन इंग्लिश'चे वर्गही घेतले होते, ते मला स्वतःला खूप उपयोगी पडले. 'अंतरा'मुळे संजय संगवई, अनिता बेनिंजर, मिलिंद मुळीक, सुजित पटवर्धन अशी मोठी माणसे बघायला मिळाली. आज सामाजिक चळवळींमध्ये आघाडीवर सक्रिय असलेले अनेक नामवंत कार्यकर्ते 'सेरेनिटी कॉम्प्लेक्स'च्या दारातच असलेल्या 'एनकॅस' (NCAS) ऑफिसमध्ये उमेदवारी करताना बघितल्याचे आठवते. आशाताईंचा व्यासंग, त्यांनी बसवलेली 'अंतरा'च्या ग्रंथालयाची (लायब्ररीची) घडी, त्यांची कामाची एकाग्र पद्धत हे सगळे तर माझ्यासाठी शिकण्यासारखे धडे होते. 'अंतरा'मुळे प्रवासदेखील घडले. डॉ. पल्लवी आणि डॉ. प्राचीबरोबर सातारा जिल्ह्यात फलटण तालुक्यात आणि पुणे जिल्ह्यात वेल्हा, पुरंदर या तालुक्यांमध्ये पुष्कळदा गेले.

माझ्यासाठी आणखी एक खास गोष्ट म्हणजे माझ्या मुलाचा जन्म मी 'अंतरा'त असताना झाला. प्रसूतीच्या (डिलिव्हरीच्या) आदल्या आठवड्यापर्यंत मी नियमित ऑफिसला जात होते. मंगल मावशी माझ्यासाठी जवळपास दररोज एक भाकरी आणि कोणतीही पालेभाजी घेऊन येत. नाना तेवढ्याच नेमाने पानाचे विडे जवळजवळ रोजच आणायचे. सगळ्यांनी मिळून माझे ऑफिसमध्ये डोहाळेजेवण केले, तेव्हा मावशींनी घमेलेभर भिजवलेल्या मिश्रणाचे सगळ्यांसाठी पोटभर साबुदाण्याचे थालीपीठे केले होते आणि मानसीने साजूक तुपातला शिरा केला होता. या खूप आनंदाच्या वैयक्तिक आठवणी आहेत. आशाताईंच्या डब्यातल्या बटाट्याच्या खरपूस काचऱ्या, त्यांच्या विशिष्ट शैलीतली – बटाट्याच्या फोडी फोडणीला टाकल्यावर अजिबात लक्ष द्यायचं नाही आणि मग अजिबातच लक्ष द्यायचं नाही – ही काचऱ्यांची पाककृती आणि भिजवलेल्या मसूर डाळीची कोशिंबीर अविस्मरणीय राहतील. एकदा मी आणि डॉ. प्राची जेजुरीजवळच्या एका छोट्या वस्तीवर चारा पिकांचे प्रशिक्षण द्यायला गेलो होतो, तो दिवस गणपतीतल्या गौरी आगमनाचा होता. दुपारची वेळ होती. एका शेतातून जाताना वाटेवर एक खोपटे (झोपडी) लागले. आत बसलेल्या मावशींकडे आम्ही काही चौकशी केली, तर त्यांनी दोघींना आम्हाला खोपट्यात बोलावले. चटकन जमिनीवर दोन पटकुरे टाकली आणि आमच्या हातावर एकेक भाकरी आणि त्यावरच शेपूची परतलेली भाजी ठेवली. दारात अनायासे दोन गौराया चालून आल्याची त्यांनी बोलून दाखवलेली खुशी मी कधीच विसरू शकत नाही. दुसरा प्रसंग फलटण तालुक्यातल्या एका धनगर वस्तीवरचा आणि थोडा तात्त्विक आहे. मी आणि डॉ. पल्लवी त्यांच्या वस्तीवर दस्तऐवजीकरणासाठी (डॉक्युमेंटेशनसाठी) गेलो होतो. तेव्हा त्यांचे राहणीमान बघितले आणि माझा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. दोन मोठ्या रिकाम्या खोल्या, भिंतींवर दोन दांड्या, त्यावर एकेक–दोन–दोन लुगडी, सदरे, लेंघे असे जुजबी कपडे.

भिंतीकडेला जेन (जिन्यास– अंथरण्यासाठी कापडाची घडी) आणि घोंगड्यांची रास. खालीही खोलीभर घोंगडीच अंथरलेली. बाकी कपाट, टीव्ही, खुर्ची, पलंग भानगडी नाहीत. घराबाहेर समोर अर्धगोलाकार अर्ध्या भिंतीचे आणि वरती छप्पर घातलेले खुले स्वयंपाकघर. त्यात भिंतीच्या आडोशाला चूल, शेजारी सरपण. एक खोलगट लोखंडी तवा, लाकडी काथवट, एखादे उलथणे, डाव, पाच–सात मीठ–चटणीच्या–चहा–साखरेच्या बरण्या आणि एक–दोन हिंडालियमची (Aluminium) पातेली. जेवायचे मोठे थाळे. स्टीलचे मोठे तांबे आणि पेले. त्या बाईंनी झपाझप भाकरी भाजल्या, पातेलेभर कालवण केलेले होते, शेजारी वैल (चुलीवर भांडे ठेवण्याची जागा) वर दूध संथ तापत होते. घरची माणसे भोवतीने बसली, थाळ्यात भाकरीशी पातळ कालवण आणि भातावर खरपूस तापलेले दूध घेऊन ताजे पहिल्या वाफेचे अन्न जेवली. प्रत्येकाने हातासरशी आपापले थाळे धुऊन ठेवले. बाईही पाठोपाठ गरम जेवल्या, स्वयंपाकघर बंद करून मेंढरांकडे लागल्या. हे माझ्यासाठी 'मिनिमॅलिझमचे' (किमान गरजांचे) प्रत्यक्ष उदाहरण होते, जे मला तोवर फक्त ऐकून माहीत होते. आर्थिक परिस्थितीचा आणि राहणीमानाचा काही संबंध नसतो, गरजा वाढवून आपण जगण्यातले ताणही वाढवून घेतो. त्याचवेळी, आपण ज्या समाजात राहतो तसे राहणीमान ठेवणे आपल्याला भाग असते. शहरी माणसांसाठी हे अटळ दुष्टचक्र आहे. पण माझा मूळचा पिंड किमान गरजांचा असल्यामुळे, माझे त्या जीवनशैलीने चटकन लक्ष वेधून घेतले. तेव्हापासून मी ते माझ्या जगण्यात जाणूनबुजून आणण्याचा प्रयत्न करत आहे. मी पर्यावरणाची विद्यार्थिनी असल्यामुळे हे सगळे परस्परपूरक ठरते. हा माझ्यासाठी 'अंतरा'च्या नोकरीतून मिळालेला सर्वात मोठी शिकवण होती. बाकी, माझ्या कामासाठी 'अंतरा' पगार तर देतच होती, परंतु मी 'अंतरा'त नसते तर हा आयुष्यभर पुरणारा दुर्मिळ अनुभव मला मिळाला नसता.

'अंतरा'बद्दल माझ्या बहुतांश आठवणी अशा आनंदाच्याच आहेत. सहसा नोकरी म्हणल्यावर असे होत नाही. काही ना काही कामाचे ताण, नावडती कामे, तडजोडी या बाबी असतातच. 'अंतरा'त हे प्रमाण फार कमी होते, हे माझा हा जेमतेम साडेतीन वर्षांचा प्रवास वाचून लक्षात येईल.

डॉ. नित्या आणि सगळे माजी सहकारी यांचे या सगळ्या आनंदी आठवणींसाठी मनापासून आभार. 'अंतरा' सोडून सतरा वर्षे झाली हे या आठवणी लिहून काढताना मुळीच जाणवले नाही, यातच काय ते आले.



# समाजाशी नव्याने जोडले गेले

**अश्विनी लबडे**

'अंतरा' ही महिला पशुवैद्यांनी स्थापन केलेली संस्था ग्रामीण, आदिवासी पशुपालक समुदायांकडे लक्ष देते. यामध्ये प्रामुख्याने गायी, शेळी, मेंढ्या इत्यादींवर अवलंबून असल्याने मुख्य प्रवाहातील विकासापासून दूर राहिलेले पशुपालक आहेत. आता 'अंतरा'ने विविध प्रकल्पांद्वारे पशुपालन, जैवविविधता, ग्रामीण जीवनाचा सहभागी विकास, महिला सक्षमीकरण व परंपरागत ज्ञान या क्षेत्रात मौल्यवान योगदान दिले आहे.

महाराष्ट्र, कर्नाटकातील पशुपालक महिला, ग्रामविविधतेचे जतन, पारंपरिक औषधे, नैसर्गिक स्रोत व्यवस्थापन, पशुवैद्यकीय सेवांमध्ये स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण या क्षेत्रांमध्ये 'अंतरा' संस्थेने विशेष काम केलेले आहे. मी 'अंतरा'च्या Bringing Visibility and Recognition to Women Livestock Farmers and Pastoralists and their Knowledge या १८ महिन्यांच्या शिष्यवृत्ती (फेलोशिप) मध्ये काम केले, त्या अंतर्गत मला पश्चिम महाराष्ट्रातील पशुपालक महिला आणि त्यांचे परंपरागत ज्ञान याविषयी अभ्यास करण्याची संधी मिळाली. मी महाराष्ट्रातील विविध पशुपालक समुदायांना क्षेत्रभेटी दिल्या, विशेषतः महिलांबरोबर संवाद साधला, त्यांच्या पशुपालन पद्धती, आरोग्य, दुध उत्पादन, पशु प्रजनन याबाबत त्यांचे पारंपरिक ज्ञान नोंदवले. मी स्वतः त्या समुदायातून असल्यामुळे, माझा संवाद सहज झाला आणि मला माझ्या परंपरागत जीवनशैलीबद्दल, ज्ञानाबद्दल खोल शोध घेता आला. या कामामुळे माझ्या समुदायातील महिलांची दैनंदिन पारंपरिक कौशल्ये समोर आली, विशेष कौशल्ये असणाऱ्या महिलांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. हे पुरस्कार सलग तीन वर्षे दिले, ज्यातून महिलांना आपल्या कामाला सन्मान दिल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास उंचावण्यास मदत झाली. पशुपालन करणाऱ्या सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित समुदायांना ओळख मिळाली.

आयआयटी गांधीनगर येथे झालेल्या 'मानव आणि प्राणी यांचे नाते' या विषयांतर्गत धनगर समाज आणि त्याचे पशुसोबतचे नाते यावर शोधनिबंध (पेपर) सादर करण्याची संधी मिळाली. हा पूर्ण शोधनिबंध 'इशळपस रपव इशरीीं' या पुस्तकात प्रकाशित झाला आहे. 'सकाळ ॲग्रोवन' मध्ये 'पशुची भाषा जाणणारा धनगर समाज' हा लेख प्रसिद्ध झालेला आहे. 'Center for Pastrolism, Delhi' या संस्थेच्या त्रैमासिकात माझा लेख प्रसिद्ध झालेला आहे. 'भवताल, पुणे' यांचा दिवाळी २०२३ चा अंक 'माळराने' हा होता, त्यात धनगर समाज आणि दख्खन पठारावरील प्रमुख मेंढ्या आणि शेळ्या यांच्या जाती यावर दोन लेख प्रसिद्ध झालेले आहेत. 'वसा' यांच्या दिवाळी २०२४ च्या अंकातही धनगर समाजावर लेख प्रसिद्ध झाला. या शिष्यवृत्तीमुळे मला माझ्या परंपरागत समाजाशी नव्याने जोडले आणि त्याची वारसा व त्यांच्या ज्ञानाची शक्ती उलगडली. 'अंतरा' पुढेही अशाच कार्यप्रणालीने ग्रामीण जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत राहील. पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा.

# बीजातून साकारलेला वटवृक्ष

मानसी परांजपे

पशुवैद्यक असलेल्या डॉ. नित्या घोटगे आणि डॉ. सागरी रामदास ह्या दोन उच्चशिक्षित मैत्रिणींनी आपल्या ज्ञानाचा फायदा समाजाला करून देण्याचा एक व्यापक विचार केला आणि १९९५ साली 'अंतरा' नावाची एक स्वयंसेवी संस्था सुरू केली. उच्चशिक्षित, निष्पक्ष आणि सर्व महिला कारभारी असलेले विश्वस्त मंडळ हा मानाचा शिरपेच आहे.

मला असे वाटते, 'अंतरा'चे मर्मस्थान म्हणजे माती – मातीत मिसळणारे – मातीतून पोटात जाणारे आणि परत खत म्हणून मातीत मिसळणारे हे चक्र सेंद्रिय करण्याचे आव्हान स्वीकारणे आणि तो उद्देश ठेवून पशुपालक आणि पशुधन शेतकरी समाजाला शिक्षित करणे, हे आहे. म्हणतात ना, 'उकराल माती तर पिकतील मोती'. सेंद्रिय शेती, सेंद्रिय औषधे, पारंपरिक बियाणे साठविणे व त्याचा वापर, रासायनिक खत न वापरता मातीचा कस जपणे–वाढविणे, उत्तम आणि जास्तीचे पीक येण्यासाठी वेगळ्या व संरचित पद्धतीचा वापर करणे, विशिष्ट कोरडवाहू शेती/पाणलोट क्षेत्र, गांडूळ खत, कंपोस्ट खत, अमृत पाणी हे काही प्रकल्प ह्याचे उत्तम उदाहरण आहे.

पूर्वी मी भाजी आणायला जायचे तेव्हा, फ्लॉवर खरेदी करताना अतिशय पांढरा, स्वच्छ दिसणारा फ्लॉवर निवडून घेतला जायचा. परंतु 'अंतरा'ने तयार केलेल्या माहितीपटातून हे समजले की, जास्त रासायनिक फवारणी केलेला फ्लॉवर असा दिसतो, आणि थोडासा पिवळसर दिसणारा फ्लॉवर ह्यावर सेंद्रिय फवारणी झालेली असते, म्हणून हा असा फ्लॉवर खरेदीसाठी योग्य असतो.

पशुधन व्यवस्थापन आणि विकास ह्यासाठी जनावरांकरिता स्वच्छ पाणी, मलमूत्राचा योग्य निचरा होत असलेला निवारा, रासायनिक औषधांचा वापर कमी, नैसर्गिक औषधांचा वापर ह्यामुळे गुणवत्ता असलेले मटण–लोकर–लेंडीखत–दूध ही उपउत्पादने, चारा मिळण्यासाठी हक्क, जंगली श्वापदांपासून/माकडांपासून संरक्षण, सरकारकडून योग्य वेळी लसीकरण, योग्य पशुधन प्रजाती व जातींसह धोरणांचा संचय करण्याचा निर्णय, स्थानिक बाजारपेठा मजबूत करणे, आरोग्य आणि आरोग्य सेवांमधील आव्हाने ह्या सर्व क्षेत्रांत 'अंतरा'चे उत्तम योगदान आहे.

### पशुपालकांसाठी शैक्षणिक साहित्य

पशुपालक समुदायांबरोबर काम करताना त्यांच्या पारंपरिक ज्ञानाची आणि शास्त्राची सुंदर सांगड घालून पुस्तके आणि सेंद्रिय औषधे ह्यांची निर्मिती झाली. बराचसा मेंढपाळ समाज हा अशिक्षित आहे. त्यांना कसे शिक्षित बनविता येईल ह्याचा प्रयत्न म्हणून त्यांच्याच परिचयाच्या शब्दांची एक बाराखडी तयार केली. बाराखडींचे फ्लेक्स आणि अक्षरांचे फासे हे शिक्षण साहित्य अशा पद्धतीने तयार केले, जे स्थलांतर करताना सहजपणे त्यांना त्यांच्याबरोबर वाहून नेण्यास कठीण जाणार नाही. शिक्षण हे आपल्याच बोली आणि कर्म भाषेतून शिकले, तर अवघड जात नाही हे त्यांना समजले. शिक्षणाविषयीची भीती कमी होऊन गोडी वाढली.

## सौर दिव्यातून अंधारावर मात

आपण दिव्यांच्या साम्राज्यात राहतो, तर हा फिरस्ता समाज जंगलाजवळ किंवा मानवी वस्तीपासून लांब छोट्या वाड्यांमध्ये राहतो. त्यांच्याकडे वीज नसल्यामुळे वाड्याजवळ एखाद्या प्राण्याचे अस्तित्व समजून येत नाही. त्यापासून धोका असतो. या धोक्याचे एक निवारण म्हणून 'अंतरा'ने बऱ्याच पशुपालकांना सौर दिवे (सोलर दिवे) वाटप केले आहे. कंदिलासारखे हे सौर दिवे स्थलांतर करताना वाहून नेण्यास सुलभ झाले. पायवाटेवरून चालतानासुद्धा ह्याचा खूप फायदा झाला. महेंद्र खताळ ह्यांनी सांगितलेला एक प्रसंग आठवतो आहे. त्यांच्या वाड्याच्या इथे, रात्री अचानक मोठा साप आला आणि सौर कंदील असल्यामुळे त्या सापाला हाकलवून लावणे शक्य झाले आणि पुढचा धोका टळला. शेतकऱ्यांसाठीसुद्धा ज्या भागात शेतीला पाणी मिळत नाही, त्या भागात पाणी उपसण्याचे मोठे सौर पंप उपलब्ध करून दिले आहेत.

## पशुपालनातील महिलांचे योगदान

पशुपालनात महिलांचे योगदान कसे आणि किती ह्यावर 'अंतरा'ने कायम भर दिला आहे. दैनंदिन कामे करताना लहान कोकरांचे संगोपन, इतर नैसर्गिक आपत्तींपासून किंवा श्वापद प्राण्यांपासून त्यांचे संरक्षण, स्थलांतराच्या वेळी संपूर्ण घराची घोड्यावर योग्य बांधणी, कलाकुसर, कळप चरायला नेणे, प्राण्यांना दुखापत झाल्यास प्रथमोपचार करणे, आपले ज्ञान पुढच्या पिढीला शिकवणे ही सर्व कामे एक पशुपालक महिला तत्परतेने करत असते. ह्याची दखल घेऊन २०२१ पासून काही विशेष कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान करून त्यांना पारितोषिक देण्यात आले. पारितोषिकाचे स्वरूप महिलांना एक साडी, सौर दिवा (सोलर लॅम्प), 'अंतरा'ची सेंद्रिय औषधे, सन्मानपत्रक असे होते. मोबाईल फोन कायम पशुपालक पुरुषांकडे असतो आणि महिलांना संपर्क करता येत नाही, हे जाणून सर्वात पहिले २ वर्षे सर्व महिलांना टॅब आणि मोबाईल सुद्धा दिलेले आहेत.

## हवामान बदलाचे परिणाम

जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदल ह्यामुळे खूप विचित्र घडामोडींना तोंड द्यावे लागते आहे. २००८ साली ह्या मुख्य बाबीवर काम करण्यासाठी 'अंतरा'ने एक स्वतंत्र कार्यशाळा घेतली होती. हवामान बदलामुळे प्राण्यांच्या जीवाची हानी, शेतीमध्ये पिकाचे नुकसान, पीक घेण्यामध्ये बदल, मेंढपाळकांचे स्थलांतराचे मार्ग आणि वेळापत्रकात बदल ह्या सर्व गोष्टींवर खूप परिणाम झालेला आहे. ह्या समाजाशी संपर्क ठेवून ह्या सर्व गोष्टींचे अवलोकन करणे हे काम 'अंतरा' करते आहे.

## 'फोनवरून संदेश'

२००८ सालापासून 'अंतरा'ने 'फोनवरून संदेश' हा सुद्धा एक उपक्रम सुरू केला होता. दरमहा दोनदा अशा प्रकारे संदेश पाठवला जायचा. बऱ्याचशा सरकारी योजना ह्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत आणि अशिक्षित असल्यामुळे त्याचा कसा लाभ घ्यावा ह्याचे ज्ञान त्यांना नसते. जन्म दाखला अशा अगदी महत्त्वाच्या कागदपत्रांचा अभाव, त्यामुळे बऱ्याच योजनेसाठीची पूर्तता ते करू शकत नाही. आधार कार्ड झाल्यामुळे खूप गोष्टी सुकर झाल्या.

## ज्ञान प्रसार

'अंतरा'ने आपल्या संशोधनात्मक प्रकल्पांमधून कार्यशाळा, प्रशिक्षण, माहितीपट बनविणे, प्रदर्शनात स्टॉल उभारणे ह्यांतून ज्ञानाचा प्रसार केला आहे.

## 'सर्वांसाठी उत्तम अन्न'

अलीकडच्या काळात आपण 'उत्तम व पौष्टिक आहार' ह्याविषयी कितीतरी कार्यक्रम बघत असतो. २०१६ मध्ये 'अंतरा'ने ह्या विषयावर 'सर्वांसाठी उत्तम अन्न' हा प्रकल्प केला होता. त्याचा एक उद्देश गावातील गरीब माणसाकडून, शहरातील गरीब माणसाला अन्न मिळणे असा होता. उदाहरणार्थ, तुती, जांभूळ हे फळ खूप पौष्टिक आहे. त्यामध्ये लोह आणि व्हिटॅमिन सी भरपूर आहे. हे फळ शहरातील गरीब माणसाला जास्त पैसे देऊन विकत घेणे शक्य नाही. तुती, जांभूळ हे फळ गावात झाडांवर सहज मिळणारे फळ आहे. गावातील गरीब माणसाकडून, शहरातील गरीब माणसाला माफक दरात विकले गेले, तर दोघांचाही फायदा आहे. ह्या प्रोजेक्टमधील मला आवडलेला सर्वात चांगला मुद्दा हाच. कोकणातील छोटे शेतकरी, कर्जत येथे राहणारे आदिवासी ह्यांच्याबरोबर पारंपरिक बियाणे, नष्ट किंवा कमी होत चाललेल्या पौष्टिक भाज्या ह्याची एक कार्यशाळा घेतली होती. रत्नागिरीमध्ये तर पारंपरिक पदार्थ बनविणे ह्याची एक स्पर्धा घेतली होती. सर्व शेतकरी महिलांनी अगदी हिरीरीने भाग घेतला होता. तसेच दख्खनी जातीची मेंढी टिकावी ह्यासाठी सुद्धा 'मेंढी स्पर्धा' आयोजित केल्या होत्या. स्पर्धा आयोजन आणि प्रत्यक्ष स्पर्धा एक सुंदर सकारात्मक वातावरण तयार व्हायचे. मी स्वतः एका स्पर्धेला उपस्थित राहिले होते.

## संस्थेचे सहयोगी

'अंतरा' संस्थेला एस. डी. सी., स्वित्झर्लंड (२००० ते २०१०), फोर्ड फौंडेशन, न्यूयॉर्क (२००५ ते २००९), मिसेरिओर, जर्मनी (२००५ ते २०२४) अशा काही प्रमुख परदेशी संस्थांकडून निधी प्राप्त झाल्यामुळे संशोधनात्मक प्रकल्प करणे व पशुधन विकास आणि व्यवस्थापन ह्या उद्देशांसाठी काम करणे शक्य झाले आहे. सामायिकरित्या आणि सामूहिकपणे आपल्या उद्दिष्टांवर काम करणाऱ्या संस्था 'अंतरा'बरोबर जोडून आहेत आणि काही प्रकल्पांसाठी गटाने काम केले जाते. उदाहरणार्थ, गरीब डोंगरी संघटना, इनोरा, सी. एफ. पी., अवॉर्ड, सी. पी. सी. संस्था. गरीब डोंगरी संघटनेचे जितेंद्र मैड हे जुने सहकारी अजूनही 'अंतरा'च्या संपर्कात आहेत. यांची समुदायाला एकत्र बांधणे, उत्तमरीत्या माहिती संकलन ही हातोटी आहे.

## जनावरांपासून माणसांना होणाऱ्या आजाराबाबत जागृती

यू. के. ई. सी. एच., यू. के. ह्या संस्थेकडून २०२१ ते २०२५ जनावरांपासून माणसांना होणाऱ्या रोगांवर संशोधन प्रकल्प केला आहे. जंगलामध्ये आणि जवळपास वास्तव्य करणारा पशुपालक ह्याला गोचीड, माकड आणि उंदीर ह्या प्राण्यांपासून होणारे रोग माणसांना होतात, त्यावर काय सावधगिरीचे उपाय करता येतील ह्यावर एक संशोधन प्रकल्प केला आहे. कोल्हापूर, सिंधुदुर्ग येथील जंगलाजवळ राहणाऱ्या समूहाशी संपर्क आला. आजरा, आवंडी येथील महिला आपले मनोगत, अडचणी व्यवस्थितपणे मांडणाऱ्या आहेत. बांद्राईवाडा येथे राहणारे जीवबा वीर ह्यांनीसुद्धा 'अंतरा'ला

के.एफ.डी. (Kyasanur Forest Disease) आणि लेप्टोसायरोसिस (Leptospirosis) ह्या त्यांच्या गावात झालेल्या उद्रेकाबद्दल अगदी संपूर्ण माहिती दिली. ह्या प्रोजेक्टच्या निमित्ताने जोडला गेलेला समाज, आता 'अंतरा'बरोबर कायमचा जोडला गेला आहे. संगीता खापरे ही जुनी कार्यकर्ती, हिचे सर्व समुदायातील लोकांना एकत्र आणणे, त्यांच्या गावांना भेटी देणे, त्यांच्याशी सतत संपर्कात राहणे, सर्वांबरोबर एकोप्याने व सलोख्याने वागणे हे अतिशय आकर्षक आहे.

निवेदि, बंगळूर येथील संस्थेला झालेली भेट कायम स्मरणात राहणारी आहे. प्रत्यक्ष प्रयोगशाळेत (लॅबोरेटरी) मध्ये कसे काम चालते हे बघण्याचा अनुभव अतिशय रोमांचक होता. सर्व तिथल्या शास्त्रज्ञ आणि संशोधक ह्यांच्याबरोबर नित्या ताईंनी घेतलेल्या बैठकीत मला सहभाग घेता आला, ह्याविषयी मी अतिशय कृतज्ञ आहे. गोचीड सारखा नखाएवढा दिसणारा प्राणी सूक्ष्मदर्शकातून (मायक्रोस्कोपमधून) खूप मोठा बघता आला. जनावरांचे मूत्र आणि जनावरे पिणारे पाणी संशोधन करण्यास आपण कुठे दिले होते हे बघून आजरा, आवंडी येथील महिलांना खूप आनंद झाला.

'लिव्हिंग लाईटली' हे सुषमा अय्यंगार ह्यांनी सी. एफ. पी. च्या मदतीने आयोजित केलेले प्रदर्शन अतिशय सुरेख, उद्बोधक होते. पशुधन सांभाळणारा फिरता समाज ह्यांच्या संपूर्ण जीवनाचे चालते-फिरते प्रदर्शन, उत्तम मांडणी, बाळूमामाच्या मेंढ्या व त्यांची कहाणी सांगणारा चित्रपट सर्वांनाच आवडला.

मी सप्टेंबर २००३ पासून 'अंतरा' संस्थेमध्ये लेखापाल (अकाउंटंट) ह्या पदावर काम करते आहे. दैनंदिन प्रशासनाचा हिशोब हे काम देखील माझ्याकडे आहे. त्यावेळी एकंदरीतच सामाजिक, भौगोलिक परिस्थिती वेगळी होती. आपल्याबरोबर समाजाच्या उन्नतीचे भान होते. संस्थेमध्ये कितीतरी आरोग्य कर्मचारी आणि जनावरांचे डॉक्टर काम करीत होते. २०१५ पर्यंत राजू सागर हा हैदराबाद ऑफिसमधील माझा सहकारी होता. परदेशी आणि देशी निधींचे हिशोब कसे ठेवायचे हे मी त्याच्याकडून शिकले आहे. सी.ए. पल्लवी गोसावी, सी.ए. नयना मोहिते ह्यांनी मला माझ्या अडचणीत कायम मदत केली आहे आणि योग्य हिशोब ठेवण्याचे तंत्र समजावून सांगितले. माझ्या कामामध्ये ह्यांच्यामुळे उन्नती झाली आहे. मी जरी लेखापाल/हिशेबनीस असले तरीही वरील नमूद केलेल्या बऱ्याच कामांमध्ये मी स्वतः सहभाग घेतला आहे. नित्या ताईंनी मला ही संधी दिल्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. ह्या सर्व गोष्टीत सक्रिय सहभाग घेतल्यामुळे 'अंतरा'शी माझे नाते जवळकीचे झाले आहे.

आत्ताचे जग हे सेकंदा-सेकंदाला बदलणारे आहे. नवीन तंत्रज्ञान, सामाजिक माध्यमे ह्यांनी प्रभावित झालेले आहे. म्हणून लिहिता-वाचता न येणाऱ्या वंचित समाजाला काय आणि कसे ऐकवितो व दाखवितो हे 'अंतरा'पुढे एक मोठे आव्हान आहे.

## समाज व निसर्ग यांच्यातला 'सुर' जपणारी अंतरा

पूजा शिंदे

'अंतरा' या संस्थेबरोबरचा माझा प्रवास अतिशय खास आणि संस्मरणीय आहे. संशोधन सहाय्यक म्हणून माझी ही पहिली नोकरी– आणि आज या क्षेत्रात दहा वर्षं पूर्ण होत असताना मागे वळून पाहताना मनात कृतज्ञतेची भावना दाटून येते. या प्रवासाला इथेच सुरुवात झाली, याचा मला नेहमीच अभिमान वाटतो. पहाटे–पहाटेच्या शेतफेरी, मेंढी–मेंढपाळ समाजांच्या जीवनपद्धती समजून घेण्यासाठी केलेले प्रयत्न, थंड हिवाळ्यातील दुपारी ऑफिसमध्ये सहकाऱ्यांसमवेत झालेल्या चर्चा – हे सगळं शिकताना मजाही तेवढीच आली. 'अंतरा'ने मला शिकवलं की, आपल्या आवडीच्या गोष्टी कराव्यात, आणि समाजासाठी काहीतरी परत द्यावं – तेही अत्यंत अनोख्या, अर्थपूर्ण मार्गांनी. आज आपण 'अंतरा'च्या ३० वर्षांची वाटचाल साजरी करत असताना मी अधिक आनंदी आणि अभिमानित होते आहे. माझ्या या प्रवासाची सुरुवात 'अंतरा'तूनच झाली, याचा मला मनापासून अभिमान वाटतो! 'अंतरा'ने खऱ्या अर्थाने समाज व निसर्ग यांच्यातला 'सूर' जपला आहे–जसा कवितेच्या अंतऱ्यातला भाव.

## अंतरा सोबत जुळलेली नाळ

गायत्री विलास खापरे

'अंतरा'मध्ये माझे पहिले पाऊल पडले, तेव्हा मी एक लहान बाळ होते. माझ्या आई (संगिता खापरे) बरोबर मी संस्थेत येत असे आणि तिच्याबरोबर ग्रामीण भागात जाऊन ती कशी त्या माणसांचे प्रश्न सोडवते आणि त्यांना कशा प्रकारे वनस्पतींपासून होणारे उपयोग आणि औषध याचे प्रशिक्षण देते हे पाहत असे. आई वनस्पतींविषयी सांगायची, आणि त्या औषधांइतकीच तिचं ऐकणं, समजून घेणं, माणसांची काळजी घेणं – हे पाहून कळलं की उपचार फक्त शरीराचे नसतात, मनाचेही असतात. त्यावेळी असे वाटायचे, मी पण मोठी झाले की आईसारखेच सामाजिक काम करणार. मी समाजकार्य शिकण्याचा निर्णय घेतला तो या २० वर्षांच्या अनुभवामुळेच. एका संस्थेत, आईसोबत जाऊन घालवलेली ही २० वर्षे माझ्यासाठी शिकवण आणि प्रेरणा देणारी होती. त्यातून संस्थेसोबत कुटुंबासारखी नाळ जुळली. संस्थेतून शिकवण घेऊनच समाजाची सेवा करायची असे मी ठरवले आणि समाजकार्याचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यामुळेच आज मी म्हणते – ही संस्था माझं शिक्षण आहे, माझी शाळा, माझं कॉलेज आणि माझं व्रत. आहे. संस्थेतील प्रत्येक गाभा, प्रत्येक कार्यक्रम, प्रत्येक महिला आणि प्रत्येक शेतकरी हे सर्व माझ्या आयुष्यातील शिक्षक आहेत.

पदवी (ग्रॅज्युएशन) झाल्यानंतर मी 'अंतरा' संस्थेत इंडोझूरीस्क (Indo-Zoonosis Risk Project) प्रकल्पाअंतर्गत 'इंटर्न'

म्हणून काम सुरू केले. या काळात मला पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळाला. गावोगावी जाऊन लोकांशी संवाद साधणे, माकड ताप (KFD) विषयी सर्वे फॉर्म भरणे, निसर्ग स्रोतांचे नमुने घेणे, लोकांना रोगांबाबत माहिती देणे यासारखी कामे करत असताना मला अनेक नव्या गोष्टी शिकायला मिळाल्या. या काळात मी संघात (टीम) काम करणं, स्थानिक लोकांशी विश्वास निर्माण करणं, माहिती संकलित करताना संयम व संवेदनशीलता राखणं हे गुणही आत्मसात केले. प्रत्येक गावात, प्रत्येक भेटीत काहीतरी नव्याने शिकायला मिळालं. या इंटर्नशिपने मला समाजातील आरोग्यविषयक समस्यांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहायला शिकवलं आणि माझ्या करिअरच्या दृष्टीने एक भक्कम पाया घालून दिला. आज मी जेव्हा समाजकार्याच्या दिशेने पाऊल टाकते, तेव्हा माझ्या पाठीशी आई आहे, 'अंतरा' आहे. माझ्यासाठी ही २० वर्षे म्हणजे एक अनमोल भेट आहे.



## अंतराशी असलेले नाते

### प्राची डोईफोडे

'अंतरा' संस्थेशी माझे जुने आणि भावनिक नाते आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'अंतरा' ही संस्था माझ्या मनात खोलवर रुजलेली आहे. माझी पहिली नोकरी मला 'अंतरा'मध्ये मिळाली, याबद्दल मी स्वतःला भाग्यवान मानते. येथे मला अनेक उत्तम व्यक्तींसोबत काम करण्याची संधी मिळाली, ज्यामुळे मनुष्य आणि प्राणी यांच्यातील सखोल नातेसंबंध शिकण्यास आणि समजून घेण्यास मदत झाली. 'अंतरा'तील माझे दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात चांगले दिवस होते.

मला राजस्थानपासून ते अंदमानपर्यंत, आणि महाराष्ट्रापासून ते झारखंडपर्यंत विविध ठिकाणी जाण्याची संधी मिळाली. यामुळे मी असंख्य लोकांना भेटले, त्यांच्याशी संवाद साधला आणि प्राण्यांचे संगोपन करताना त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. मी केवळ प्राण्यांसोबतच नव्हे, तर वनस्पतींवरही काम केले; यामुळे माझ्या ज्ञानात भर पडली आणि एक नवीन दृष्टिकोन मिळाला.

या स्वयंसेवी संस्थेची सुरुवात करणाऱ्या नित्या अक्का यांना मी काम करताना खूप जवळून पाहिले आहे आणि त्यांच्याकडून खूप काही शिकले आहे. सध्या चर्चेत असणाऱ्या शाश्वत पर्यावरण आणि जैवविविधता संवर्धन यांसारख्या विषयांवर नित्या अक्का अनेक वर्षांपासून काम करत आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत प्रेरणादायी आणि ऊर्जावान आहे.

'अंतरा'च्या तीस वर्षपूर्तीनिमित्त मी त्यांचे अभिनंदन करते आणि त्यांच्या पुढील प्रगतीच्या वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देते.

## 'तोरण'

सोनाली जितेंद्र मैड

तुझा माझा भाऊ पणा, झाली तीस साल
अंतरा ची नित्या ताई, काय लिहून पाठविल

पोस्टमन दादा, आला लिफाफा घेऊन
पहाते मी उघडून, हाती लागले तोरण

तोरण, तोरण, तोरण ची ओढ भारी
सहा तीन महिन्यांनी येते त्याची स्वारी

पिक पाण्याची वार्ता, गाई गुरे, चारा पाणी
काय गावाची बातमी, कोणी सांगे आठवणी

दही, दुध, भाजी, ताक, तुप, लोणी
सगळ्या भेटतील सोबतीणी

तोरण तोरण, विचारांची मखरण
शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या, गाईचं हंबरण

तोरण, तोरण, विचारांची पेरणी
सेंद्रिय शेती, पिकाची लावणी

तोरण, तोरण, आजारांवर उपचार
कसा मी विसरू, अंतरा चा पाहुणचार

अंतराचे तोरण, मीत लावीले दारी
शोभा आली माझ्या घरी

तोरणच्या नावाची मीत ओवी ही गायली
अंतरा संगती, माझी मैतरी जुळली

सांगते बाई तुला, शिक अक्षर ओळख
तोरण मधून, जाण मिळते ठळक

वाचते तोरण, मी त विचार जोडते
विचारांनी, विचारांशी नाते हे जडते



**बुक-पोस्ट**

प्रति,


**अंतरा**
एफ, लँटाना गार्डन्स, एन.डी.ए. रस्ता,
बावधन, पुणे ४११ ०२१, महाराष्ट्र
दूरध्वनी : (२०) २२९५३५४६, २२९५३५४७
ईमेल : **anthra.pune@gmail.com**
वेबसाईट : **www.anthra.org**


